<u>राज्यातील हवामान,खरीप हंगाम २०१९ पिक परिस्थिती व रब्बी हंगाम २०१९-२० पिक पेरणी, पिक परिस्थितीचा दिनांक ३१/०१/२०२० अखेरचा साप्ताहिक अहवाल</u>

**हवामान व पर्जन्यमान** – राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच कोंकण,अमरावती व नागपूर विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. इतर विभागात हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९ पिक परिस्थिती** -

राज्यात कापूस पिकाची वेचणी अंतिम टप्प्यात आहे. तूर पिक शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून,काढणी प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग** - राज्यात अमरावती व नागपूर विभागात काही ठिकाणी तूर पिकावर पानाफुलांना जाळी करणारी अळी, शेंगमाशी व शेंगा पोखरणा-या अळींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

कृषि विभागामार्फत किड व रोग नियंत्रणासाठी प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे. राज्यात किड व रोगांवरील उपाययोजना म्हणून शेतीशाळा, प्रात्यक्षिके, कृषि विद्यापिठाकडून पीक संरक्षणाचे दृष्टीने सल्ले, योजनांतर्गत फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा, बाधीत क्षेत्रास तज्ञांच्या भेटी, जनजागृतीसाठी विभागस्तरावर हंगामपूर्व कार्यशाळा, गावबैठका, एसएमएसद्वारे सल्ले इ. उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

दि.२४.०१.२०२० अखेरच्या अवेळी पाऊस व गारपिटीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राबाबतच्या नजरअंदाजित प्राथमिक अहवालानुसार दि.३१ डिसेंबर,२०१९ ते दि.०३ जानेवारी, २०२० या कालावधीत राज्यात ७१,२६३ हेक्टर क्षेत्र अवेळी पाऊस व गारपिटीमुळे बाधित झाले आहे. बाधित पिकांमध्ये प्रामुख्याने कापूस, तूर, हरभरा, गहू, ज्वारी, संत्रा, मोसंबी, आंबा व भाजीपाला या पिकांचा समावेश आहे.

**रब्बी हंगाम २०१९-२०**- राज्यात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५६.९३ लाख हेक्टर असून दि.३१ जानेवारी, २०२० अखेर ५६.१३ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८.६०%) पेरणी झाली आहे. ज्वारी पिक पोटरी, फुलोरा, दाणे भरणेच्या तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे. हरभरा फुलोरा, घाटे भरणे ते घाटे पक्वतेच्या अवस्थेत आहे. गहू पिक कांडी धरणे, ओंब्या लागणे ते ओंबीमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. करडई पिक फुलोरा ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे. तर मका पिक फुलोरा ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.



**किड व रोग-** राज्यात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**विभागीय पिक परिस्थिती-**

**कोकण विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच विभागात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची नोंद झाली.

**रबी हंगाम २०१९-२०** - विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून दि.३१ जानेवारी, २०२० अखेर ०.२७ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप पिकांची कापणी झालेल्या व ओलावा असलेल्या क्षेत्रात पिकांच्या पेरणीची कामे झाली आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग-** निरंक

**नाशिक विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९** –विभागात कापूस पिकाची अंतिम वेचणी प्रगतीपथावर आहे. तुर पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे.

**किड व रोग-** निरंक

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.३१ लाख हेक्टर असून दि.३१ जानेवारी, २०२० अखेर ४.७२ लाख हेक्टर क्षेत्रावर (११०%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु आहे. ज्वारी पिक दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंब्या लागणेच्या अवस्थेत आहे. तेलबिया पिके फुलोरा अवस्थेत आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**पुणे विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९ -** विभागात तूर पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी प्रगतीपथावर आहे. कापूस पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, वेचणीचे काम चालू आहे.

**किड व रोग-** निरंक

**रबी हंगाम २०१९-२०-** विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र १७.८१ लाख हेक्टर असून दि.३१ जानेवारी, २०२० अखेर ११.७७ लाख हेक्टर क्षेत्रावर (६६%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक ओंब्या लागणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे. ज्वारी पिक दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. सुरु ऊसाची लागवड चालू आहे. पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९ -** विभागात तूर पिकाची काढणी प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग**-निरंक

**रबी हंगाम २०१९-२०-** विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५.०७ लाख हेक्टर असून दि.३१ जानेवारी, २०२० अखेर ४.३१ लाख हेक्टर क्षेत्रावर (८५%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक फुटवे फुटणे, कांडी धरणे ते फुलोरा अवस्थेत आहे. हरभरा पिक फुलोरा, घाटे धरणे ते घाटे भरणेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी घाटे पक्वतेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक पोटरी, फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे. पुर्व हंगामी ऊस वाढीच्या अवस्थेत तर सुरु ऊसाची लागवड सुरु असून, लागवड झालेले पिक उगवणीच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल फुलोरा अवस्थेत आहे. रब्बी पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात कापूस पिकाच्या वेचणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. तूर पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग-** निरंक.

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.७२ लाख हेक्टर असून दि.३१ जानेवारी, २०२० अखेर ९.१४ लाख हेक्टर क्षेत्रावर (११८%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक घाटे लागणे ते घाटे भरणेच्या अवस्थेत आहे. गहू पिक कांडी धरणे, ओंब्या लागणे ते ओंबीमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक पोटरी, कणसे लागणे तर काही ठिकाणी दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक तुरे लागणे ते कणसे भरणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका व रब्बी ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**लातूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९** -विभागात तूर पिकाची काढणी अंतिम टप्प्यात आहे. कापूस पिकाची अंतिम वेचणी चालू असून, बऱ्याच ठिकाणी वेचणी पुर्ण झाली आहे.

**किड व रोग-** निरंक.

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ११.१४ लाख हेक्टर असून दि.३१ जानेवारी, २०२० अखेर १४.३७ लाख हेक्टर क्षेत्रावर (१२९%) पेरणी झाली आहे. विभागात रब्बी ज्वारी पिक कणसे लागणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. गहू पिक कांडी धरणे, ओंब्या लागणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे लागणे, घाटे भरणे तर काही ठिकाणी घाटे पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु झाली आहे. करडई पिक फुले ते बोंडे धरणेच्या अवस्थेत आहे. मका पिक तुरे ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात कापूस पिकाची वेचणी अंतिम टप्प्यात आहे. तूर पिकाची कापणी आणि मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी तूर पिकावर शेंगमाशी, पानाफुलांना जाळी करणारी अळी व शेंगा पोखरणाऱ्या अळींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ६.४७ लाख हेक्टर असून दि.३१ जानेवारी, २०२० अखेर ७.४६ लाख हेक्टर क्षेत्रावर (११५%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक फुलोरा ते घाटे भरणेच्या तर काही ठिकाणी घाटे पक्वतेच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंब्या लागणेच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**नागपूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम २०१९ -** विभागात तूर पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी कापणी व मळणी सुरु आहे. कापूस पिकाची वेचणी प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी तूर पिकावर शेंगमाशी, पानाफुलांना जाळी करणारी अळी व शेंगा पोखरणाऱ्या अळींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१२ लाख हेक्टर असून दि.३१ जानेवारी, २०२० अखेर ४.१० लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक फुटवे फुटणे, ओंब्या लागणे ते ओंब्या भरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

महाराष्ट्र राज्यातील रब्बी हंगाम २०१९-२० मुख्य पिकाखालील दि. ३१-०१-२०२० पर्यंतचा पेरणीचा साप्ताहीक प्रगती अहवाल.

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (१२-१३ ते १६-१७) | मागिल वर्षाची पेरणी दि ०१/०२/२०१९ | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रब्बी ज्वारी | २६७८५१३ | १२४६३४२ | १८४८७७६ | ६९ | १४८ |
| २ | गहू | १०१४८०४ | ५६९२७२ | १११०१६६ | १०९ | १९५ |
| ३ | मका | २२५२६० | ११५४१८ | २३९९१८ | १०७ | २०८ |
| ४ | इतर रब्बी. तृणधान्ये | १२४६२ | १३०३३ | ९१६१ | ७४ | ७० |
|  | **एकूण रब्बी. तृणधान्ये** | **३९३१०३९** | **१९४४०६५** | **३२०८०२१** | **८२** | **१६५** |
| ५ | हरभरा | १४९०२४७ | १२९२७८७ | २२५१००७ | १५१ | १७४ |
| ६ | इतर रब्बी. कडधान्ये | १०९९८६ | १०९६८५ | ११४७६१ | १०४ | १०५ |
|  | **एकूण रब्बी कडधान्ये** | **१६००२३३** | **१४०२४७१** | **२३६५७६८** | **१४८** | **१६९** |
|  | **एकूण रब्बी अन्नधान्ये** | **५५३१२७१** | **३३४६५३६** | **५५७३७८९** | **१०१** | **१६७** |
| ७ | करडई | ८७६०४ | १८००० | १९१५६ | २२ | १०६ |
| ८ | जवस | २१५०४ | ७६१८ | ८६२६ | ४० | ११३ |
| ९ | तीळ | १४५२ | ५०८ | १९७ | १४ | ३९ |
| १० | सुर्यफुल | ४१६३२ | ३५२४ | २६९४ | ६ | ७६ |
| ११ | इतर रब्बी तेलबीया | ९६०१ | ५७४३ | ८७७३ | ९१ | १५३ |
|  | **एकूण रब्बी तेलबीया** | **१६१७९३** | **३५३९२** | **३९४४६** | **२४** | **१११** |
|  | **राज्यातील एकूण पीकाखालील पेरणीचे क्षेत्र** | **५६९३०६५** | **३३८१९२८** | **५६१३२३५** | **९८.६०** | **१६६** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित